# नगर परिषद कार्यालय वाडी

## जिल्हा नागपूर

comcwadi@gmail.com

जावक क्र./संगणक वि./ 375/2026 दिनांक : 07/05/2026

## ई-निविदा सुचना क्र. 1 /2026-27

मुख्याधिकारी नगर परिषद वाडी जि.नागपुर यांच्या वतीने खालील कामाच्या दोन लिफाफा पद्धतीने पुरवठादार योग्य त्या वर्गातील पंजीबद्ध कंत्राटदारांकडून निविदा मागविण्यात येत आहे. कामाच्या निविदा केवळ ई-निविदा पद्धतीने सादर करावयाच्या आहेत निविदेचा विस्तृत नमुना,अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. 08/05/2026 पासून पाहण्यास उपलब्ध राहील. कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रमाण | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | सन 2026-27 करिता नगर परिषदेतील संगणक यंत्रणा अद्यावत व चालू स्थितीत ठेवण्याकामी संगणक दुरुस्ती/देखभाल व अनुषांगिक संगणकीय साहित्य पुरवठा करणेबाबत. | सदर कामाचे साहित्याचे दर BOQ मध्ये सादर करावे. | कामाचा आदेश दिल्यापासून एक वर्ष . |

स्वा/-
मुख्याधिकारी
नगर परिषद वाडी

कार्यालय नगर परिषद वाडी
ता. जि. नागपूर

**नगर परिषद कार्यालय वाडी**

**जिल्हा नागपूर**

comcwadi@gmail.com

**जावक क्र./संगणक वि./** 376/2026 **दिनांक :** 07/05/2026

## ई-निविदा सूचना

**कामाचे नाव:-** सन 2026-27 या आर्थिक वर्षाकरिता नगरपरिषदेतील संगणक यंत्रणा अद्यावत व चालू स्थितीत ठेवण्याकामी विविध संगणक साहित्य ,संगणक दुरुस्ती/देखभाल व अनुषंगिक साहित्य पुरवठा करणेबाबत.

मुख्याधिकारी नगर परिषद वाडी जि.नागपुर यांच्या वतीने खालील कामाच्या दोन लिफाफा पद्धतीने निविदा पद्धतीच्या संगणक साहित्य पुरवठादार योग्य त्या वर्गातील पंजीबद्ध कंत्राटदारांकडून निविदा मागविण्यात येत आहे.कामाच्या निविदा केवळ ई-निविदा पद्धतीने सादर करावयाच्या आहेत. निविदेचा विस्तृत नमुना,अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक.08/05/2026 पासून पाहण्यास उपलब्ध आहे.कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**ई-निविदा प्रसिद्ध तपशील**

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिद्धी | दिनांक. 08/05/2026 |
| ई-निविदा दस्तावेज डाऊनलोड | दिनांक. 08/05/2026 ते 22/05/2026 दु 3:00 वाजेपर्यंत |
| ई-निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | दिनांक. 22/05/2026 दु 3:00 वाजेपर्यंत |
| ई-निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडण्याची दिनांक | दिनांक. 25/05/2026 दु 12:00 वाजता (शक्य झाल्यास) |

| **अ. क्र** | **कामाचे नाव** | **निविदा प्रपत्र किमत** | **अनामत रक्कम** | **कामाचा अवधी दिवस** |
|---|---|---|---|---|
| 1 | सन 2026-27 करिता नगरपरिषदेतील संगणक यंत्रणा अद्यावत व चालू स्थितीत ठेवण्याकामी विविध संगणक साहित्य ,संगणक दुरुस्ती/देखभाल व अनुषंगिक साहित्य पुरवठा करणेबाबत. | 1,000/- | 10,000/- | कामाचा आदेश दिल्यापासून एक वर्ष . |

कार्यालय नगर परिषद वाडी, जि. नागपूर.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद वाडी**

# कार्यालय नगर परिषद वाडी,जिल्हा नागपूर

## (संगणक विभाग)

## विस्तृत अटी व शर्ती

**कामाचे नाव**:-सन 2026-27 करिता नगरपरिषदेतील संगणक यंत्रणा अद्यावत व चालू स्थितीत ठेवण्याकामी विविध संगणक साहित्य ,संगणक दुरुस्ती/देखभाल व अनुषंगिक साहित्य पुरवठा करणेबाबत

1. निविदेच्या अटी, शर्ती व पुढील सर्व कार्यवाही व शुद्धीपत्रके महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. सर्व साहित्यांचे दर सादर करणे आवश्यक राहील, अन्यथा आपले निविदा रद्द केल्या जाईल.
2. निविदा फी, अनामत रक्कम ऑनलाईन भरणा करणे आवश्यक आहे. या निविदा संबंधीचे दस्तावेज स्कॅन केलेल्या स्वरुपात विहित मुदतीत ई-निविदासोबत सादर करणे बंधनकारक राहील.अपलोड केलेल्या दस्तावेजाची एक प्रमाणित प्रत निविदा मंजूर झाल्यास नगर परिषदेत जमा करावी लागेल.
3. निविदा धारकाने कमीत कमी 3 वर्षे नगरपरिषद/नगरपंचायत कार्यालय ठिकाणी उपरोक्त कार्य पार पडल्याचा अनुभव व यंत्रणा समाधानकारक चालू असल्याचे प्रमाणपत्र (कार्यालयीन अधिकारी कडून ) जोडणे आवश्यक राहील. तसेच एकूण रक्कम सारखी असल्यास जास्त अनुभव असलेल्या निविदा धारकास प्राधान्य देण्यात येईल.
4. सदर साहित्या मध्ये मागणी नुसार साहित्यांची संख्या कमी किंवा जास्त करता येईल.त्या मागणी प्रमाणे वेळो वेळी साहित्य पुरवठा करावे लागेल.
5. ई-निविदेच्या तांत्रिक लिफाफामधे स्कॅन केलेल्या स्वरुपात खालीलप्रमाणे कागदपत्र अपलोड करणे बंधनकारक राहील.
    a. दुकानाचे अध्यावत शॉप अ‍ॅक्ट नोंदणी प्रमाणपत्र
    b. कंपनीचे अद्यावत अधिकृत विक्रेता प्रमाणपत्र
    c. सन 2023-24 व 2024-25, 2025-26 वर्षाचे Income Tax Return असणे आवश्यक आहे
    d. आधार कार्ड
    e. पॅनकार्ड
    f. GST नोंदणी प्रमाणपत्र
    g. सन 2025-26 या वर्षाचे GST Clearance प्रमाणपत्र
    h. Udyam Aadhar Certificate
    i. सरासरी वार्षिक उलाढाल एक कोटी रु. पेक्षा कमी नाही याबाबत CA द्वारे प्रमाणित कागदपत्र/प्रमाणपत्र
    j. तत्सम कामाचे नगरपरिषद/नगरपंचायत कार्यालयामध्ये कमीत कमी तीन वर्षे काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र.
    k. नगर सेवकांचे / पदाधिकारी हितसंबंध नसल्याचे परिशिष्ट-अ प्रतिज्ञापत्र रु.100/- च्या मुद्रांक पेपरवर (Attested / Notary ) करून सोबत सादर/अपलोड करावे.

l. अनुज्ञप्तीधारक कुठल्याही शासकीय/निमशासकीय कार्यालयाने काळ्या यादीत फर्म/कंपनी चे नाव समाविष्ट नसल्याबाबतचे व निविदेसोबत जोडलेले कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु.100/- मुद्रांक पेपरवर सादर /अपलोड करावे.

m. तसेच अनामत रक्कम भरल्या बाबत चे बिल दर्शविणारे पत्र व इतर आवश्यक कागदपत्रे सादर करावीत (हा लिफाफा तांत्रिक लिफाफा राहील व दुसऱ्या लिफाफ्यात फक्त निविदा फार्म दर सादर करावा)

6. कामाचे स्वरूप व संपूर्ण माहिती घेऊनच निविदा सादर कराव्या.
7. निविदाधारकाचे अटीसह निविदा (Condition Tender) स्वीकारले जाणार नाही.
8. भरवायचे दर हे सर्व करासह (GST सह) समावेश असणारे असावेत.
9. BOQ (BIDS OF QUANTITY)रकाना मधील दिलेल्या हिरव्या ठिकाणी माहिती भरणे अनिवार्य आहे. अर्धवट माहिती सादर केल्यास निविदा ग्राह्य धरल्या जाणार नाही व पूर्णपणे रद्द करण्यत येईल,याची नोंद घ्यावे.
10. BOQ मध्ये दर्शविण्यात आलेल्या साहित्याचे दर सादर करतांना चालू बाजार दराचा माहिती घेऊनच दर सादर करण्यात यावे.तसेच **ई-निविदेतील साहित्याचे दर सादर करताना Refurbished साहित्याचे दर सादर करण्यात येऊ नये**. अन्यथा सदर **Refurbished** दरा मध्ये निविदाधारकास Authentic साहित्य पुरवठा करणे बंधनकारक राहील, तसे न केल्यास निविदाधारकावर शासकीय नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.
11. निविदा कालावधी आदेश मिळाल्याचा तारखेपासून ते पुढे एक वर्षा पर्यंत राहील व मुख्याधिकारी यांच्या परवानगीने आवश्यकते नुसार वाढविण्यात येईल.
12. ज्यांची निविदा मंजूर करण्यात येईल त्यांना प्रथम रुपये 500/-चे जनरल स्टंप पेपरवर करार करणे बंधनकारक राहील.
13. ज्या शासनाचे चालू सीएसआर दरातील बाबी ( आयटम ) विचारात घेवून त्या आधारे निविदा दर भरण्यात यावे. अनामत रक्कम रु.10000/- जमा राहील व ती निविदा कालवधी संपल्यानंतर परत मिळेल.
14. साहित्याचा पुरवठा आदेश(मोबाईल,भ्रमणध्वनी द्वारे, ईमेल,पत्राद्वारे) प्राप्त होताच 2-3 दिवसाच्या आत साहित्य पुरवठा करावे लागेल. आदेशप्राप्तीपासून, सर्व साहित्य आदेशात नमूद प्रमाणे मुदतीत पूर्ण करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.
15. पुरविण्यात आलेले साहित्य उत्कृष्ट दर्जाचे असणे आवश्यक आहे. तसेच साहित्य निकृष्ट दर्जाचे/ डिफेक्टीव्ह निघाल्यास ते स्वखर्चाने बदलून दयावे लागेल. तसेच पुरवठा केलेल्या साहित्य वापर व कामाचे डेमो करून दाखवावे लागेल.
16. कोणतेही साहित्य अथवा सेवा पुरविण्यात आल्यावर तात्काळ संबंधित विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचे कडून काम पूर्णत्वाचा पुरावा म्हणून विहित नमुन्यातील “काम पूर्ण प्रामाणपत्र” प्राप्त करून संगणक विभागात सादर करावे त्यानंतर च संबंधित कामाचे देयक अदा करण्यात येईल.
17. पुरवठा केलेले साहित्य तसेच Install केलेल्या यंत्रणेची 1 वर्ष हमी देणे आवश्यक आहे व Install केलेल्या यंत्रणेची 1 वर्षापर्यंत मोफत देखभाल व दुरुस्ती करून देणे आवश्यक आहे .
18. करारनाम्या प्रमाणे शासनाकडून GST,सुरक्षा ठेव व इतर अनुज्ञ कर बिलाच्या रकमे मधून कपात करण्यात येईल.कपात करण्यात आलेली सुरक्षा ठेव काम समाधानपूर्वक झाल्यानंतर व लेखापरीक्षणात कोणत्याही

प्रकारचा लेखा आक्षेप न आल्यास किंवा लेखापरीक्षणात अपेक्षित रक्कम वसुलीचे प्रकरण आढळून आल्यास सदरची रक्कम कपात करून उर्वरित रक्कम परत करण्यात येईल .

19. कंत्राटदाराचे काम समाधानकारक न आढळल्यास पुरवठा/कामाचे आदेश रद्द करून सदर पुरवठा काम अन्य कंत्राटदाराकडून करवून घेतल्यास,यावर होणारा जास्तीचा खर्च कंत्राटदाराचे अनामत रक्कम व सुरक्षा ठेवीतून वसूल करण्यात येईल. कुठल्याही प्रकारचे टाळाटाळ अपेक्षित नाही.
20. या कामासंबंधी कोणताही वाद निर्माण झाल्यास मुख्याधिकारी नगर परिषद वाडी जे निर्णय घेतील ते मान्य करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.
21. आदेशप्राप्ती पासून आदेशाप्रमाणे सर्व साहित्य आदेशात नमूद सर्व कामे मुदतीत पूर्ण करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.
22. उत्कृष्ट दर्जाचे साहित्य मुख्याधिकारी /संगणक अभियंता यांचे मागणी नुसार/सूचनेनुसार पुरवठा/काम करणे कंत्राटदारास बांधनकारक राहील.
23. आदेशप्राप्तीपासून आदेशाप्रमाणे सर्व साहित्य नगरपरिषद कार्यालयात आणून पोहचता करणे व यंत्रणा कार्यान्वयित करणे बंधनकारक राहील.
24. निविदा धारकाने सादर केलेल्या तांत्रिक बाबीचे दस्तावेजा मध्ये त्रुट्या आढळल्यास अथवा अपात्र असल्याचे आढळल्यास ती निविदा रद्द करण्यात येईल.त्याबाबत कारणे देणे, पत्र व्यवहार करणे हे बंधनकारक राहणार नाही.
25. प्राप्त होणाऱ्या निविदा मंजूर करणे किंवा सर्व निविदा नामंजूर करणे याबाबतचे सर्व अधिकार मुख्याधिकारी, नगर परिषद, वाडी यांचे कडे सुरक्षित ठेवण्यात येत असून त्याबाबत कारणे देणे, पत्र व्यवहार करणे बंधनकारक राहणार नाही.

**( डॉ.ऋचा धाबर्डे )**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद वाडी**

Signature Not Verified
Digitally signed by RUCHA GIRISH BHALEKAR
Date: 2026.05.08 18:10:35 IST
Location: Maharashtra-MH